Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education, Pune
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near e-Balbharti, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे
स.न.८३२-ए. फा.प्लॉ.नं.१७८,१७९, ई बालभारती शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 I EPABX -25705000 Fax : 25665807 I
Email : secretary.stateboard@gmail.com

(३५)

महत्वाचे/तातडीचे

क्रमांक—रा.मं./परीक्षा—६/२०९५
पुणे ४११ ००४.
दिनांक—१२.०५.२०२६

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

विषय:- माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) पुरवणी परीक्षा जून—जुलै २०२६ च्या वेळापत्रकाबाबत

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, मंडळामार्फत जून—जुलै २०२६ मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) पुरवणी परीक्षेची वेळापत्रके अंतिम करण्यात आलेली असून, त्यानुसार लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा खालील कालावधीत आयोजित करण्यात येणार आहे.

| अ.क्र. | तपशिल | उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा कालावधी (सर्वसाधारण, व्दिलक्षी व व्यवसाय अभ्यासक्रम तसेच माहिती तंत्रज्ञान व सामान्य ज्ञान विषयांची ऑनलाईन परीक्षा) | माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा कालावधी |
|---|---|---|---|
| १. | लेखी परीक्षा | मंगळवार, दि. १६ जून, २०२६ ते बुधवार, दि. ०८ जुलै, २०२६ | मंगळवार, दि. १६ जून, २०२६ ते मंगळवार, दि. ३० जून, २०२६ |
| २. | प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन तसेच NSQF अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम प्रात्यक्षिक परीक्षा | मंगळवार, दि. १६ जून, २०२६ ते बुधवार, दि. ०८ जुलै, २०२६ (माहिती तंत्रज्ञान व सामान्यज्ञान विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षेसह) | मंगळवार, दि. १६ जून, २०२६ ते मंगळवार, दि. ३० जून, २०२६ |
| ३. | दिव्यांग विद्यार्थ्यांची कार्यशिक्षण विषयांची लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा (इ.१०वी) | ………… | मंगळवार, दि. १६ जून, २०२६ ते गुरुवार, दि. २५ जून, २०२६ |

१) पुरवणी परीक्षेसाठी इ. १०वी व इ. १२वी च्या प्रात्यक्षिक परीक्षा प्रचलित पध्दतीनुसार केंद्रावर घेतली जात होती. तथापि त्यामध्ये बदल करण्यात येवून जून—जुलै २०२६ च्या इ. १०वी व इ. १२वीची प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापनाची परीक्षा देखील संबंधित शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामध्ये घेण्यात यावी, याबाबत संदर्भ—पत्र क्र.रा.मं./परीक्षा—२/५५०८, दि. २६/१२/२०२३ नुसार सर्व विभागीय मंडळांना कळविण्यात आलेले आहे.

२) प्रात्यक्षिक, तोंडी व अंतर्गत मुल्यमापनाचे गुण Portal वर ऑनलाईन पध्दतीने पाठवावयाचे आहेत. याबाबतची Link आपणांस यथावकाश कळविण्यात येईल.

३) कालावधी मर्यादित असल्याने या परीक्षेसाठी प्रात्यक्षिक, तोंडी व श्रेणी परीक्षा, आणि अंतर्गत मूल्यमापन परीक्षा 'Out of Turn' ने आयोजित करण्यात येणार नाही. तरी विद्यार्थी संख्येनुसार शाळा / कनिष्ठ महाविद्यालयामध्ये निर्धारित कालावधीत प्रात्यक्षिक /तोंडी परीक्षा / श्रेणी परीक्षा घेण्याबाबत तसेच संबंधीत विद्यार्थ्यांना त्यांचा परीक्षेचा दिनांक व वेळ याबाबतची संपूर्ण माहिती प्रत्यक्ष परीक्षेपूर्वी मिळेल याची दक्षता घेण्याबाबत शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांना सूचित करावे.

४) इ. १०वी च्या दिव्यांग विद्यार्थ्यांची कार्यशिक्षण विषयांची लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा सोबतचे परिशिष्टानुसार शालेय स्तरावर आयोजित करण्याबाबत संबंधीतांना कळविण्यात यावे. त्यानुसार पूर्वसूचना देवून संबंधीत विषयांचा प्रश्नपत्रिकेचा संच मिळण्याकरीता पुणे विभागीय मंडळाशी तातडीने संपर्क साधावा.

५) इ.१०वी व इ.१२वी प्रात्यक्षिक परीक्षेसाठी अंतर्गत व बहिस्थ परीक्षक म्हणून ज्या त्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांची नियुक्ती करण्यात यावी.

६) इ.१२वी माहिती तंत्रज्ञान (I.T.), व सामान्यज्ञान (G.K.) या विषयांची परीक्षा ऑनलाईन पध्दतीने दि.०७.०७.२०२६ व दि.०८.०७.२०२६ रोजी घेण्यात येणार आहे. सर्व विद्यार्थ्यांची ऑनलाईन परीक्षा कनिष्ठ महाविद्यालयातील संगणकाची मर्यादित संख्या लक्षात घेता एकाच वेळी घेणे शक्य नसल्याने ती गटागटामध्ये घेण्यात यावी. कनिष्ठ महाविद्यालयांना संगणक प्रयोगश... च्या क्षमतेप्रमाणे विद्यार्थ्यांचे गट करून, त्याप्रमाणे कनिष्ठ महाविद्यालयांनी परीक्षेचा दिनांक व वेळ संबंधित विद्यार्थ्यांना पुरेसा कालावधी याची माहिती परीक्षेपूर्वी करून देणे आवश्यक आहे.

जून–जुलै २०२६ पुरवणी परीक्षांच्या वेळापत्रकांची छपाई राज्य मंडळामार्फतच करण्यात येणार असल्याने शाखा भांडार, राज्य मंडळ, पुणे मार्फत सदर वेळापत्रकांच्या प्रती आपल्या मागणीप्रमाणे विभागीय मंडळांना पुरविणेबाबत पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे. तरी जून–जुलै २०२६ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) सर्वसाधारण व व्दिलक्षी व व्यवसाय अभ्यासक्रम व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) पुरवणी परीक्षेच्या अंतिम वेळापत्रकांच्या किती प्रती आवश्यक आहेत यासंदर्भात शाखा भांडार, राज्य मंडळ, पुणे यांच्याशी संपर्क साधावा.

Mali

(डॉ. दिपक माळी)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे ४.

सोबत–
१. उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) (सर्वसाधारण व व्दिलक्षी) परीक्षेचे वेळापत्रक
२. उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) (व्यवसाय अभ्यासक्रम) परीक्षेचे वेळापत्रक
३. माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेचे वेळापत्रक
४. माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) कार्यशिक्षण विषय लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा वेळापत्रक

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी–
१. व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्य मंडळ, पुणे.
२. अस्वीस, राज्य मंडळ, पुणे.
३. ऑनलाईन शाखा, राज्य मंडळ, पुणे.
४. भांडार–१, शाखा, राज्य मंडळ, पुणे.

# ।। परिशिष्ट ।।

## माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) पुरवणी परीक्षा जून–जुलै २०२६ प्रविष्ट दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी असलेल्या विषय योजनेपैकी कार्यशिक्षण विषय लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा वेळापत्रक

| अ.क्र. | सांकेतांक | विषयाचे नाव | वार | दिनांक | सत्र |
|---|---|---|---|---|---|
| १. | जे १ | घरगुती विद्युत उपकरणे / Electrical Domestic Appliances | मंगळवार | १६/०६/२०२६ | दुपार |
| २. | जे ५ | दूध व दूधाचे पदार्थ / Milk And Milk Products | बुधवार | १७/०६/२०२६ | दुपार |
| ३. | जे ९ | हस्तभरतकाम / Hand Embroidery | गुरुवार | १८/०६/२०२६ | दुपार |
| ४. | के १ | शिवणयंत्राव्दारे शिलाई व शिवणयंत्राची निगा व दुरूस्ती/ Stitching with Sewing Machine and its Repairing and Maintenance | शुक्रवार | १९/०६/२०२६ | दुपार |
| ५. | के ५ | टाकाऊ वस्तूपासून सौंदर्याकृती / Preparation of Decorative pieces by utilisation of waste material | शनिवार | २०/०६/२०२६ | दुपार |
| ६. | एल ७ | पाककला / Cookery | सोमवार | २२/०६/२०२६ | दुपार |
| ७. | एम ३ | भारतीय संगीत ( गायन–वादन) / Indian Music (Vocal & Instrumental) | मंगळवार | २३/०६/२०२६ | दुपार |
| ८. | एम ६ | चित्रकला व रंगकाम / Drawing and Painting | बुधवार | २४/०६/२०२६ | दुपार |
| ९. | एम ७ | कागदकाम पुठ्ठाकाम व पुस्तकबांधणी / Paperwork, Cardboard work and Bookbinding | गुरूवार | २५/०६/२०२६ | दुपार |

(डॉ. दिपक माळी)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे ४.

क.पु.वि.मं/उमा अ/ 4115
दि.२७.०५.२०२६

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त शाळा/ कनिष्ठ महाविद्यालये,
जिल्हा- पुणे, अहिल्यानगर,सोलापूर

उपरोक्त राज्य मंडळ प्रकटनाच्या अनुषंगाने जून -जुलै २०२६ उच्च माध्य. परीक्षेकरिता प्रविष्ठ होऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यांसाठी लेखी, प्रात्यक्षिक,श्रेणी, तोंडी व अंतर्गत मुल्यमापन तसेच इ.१० वी दिव्यांग विद्यार्थ्यांची कार्यशिक्षण विषयांची लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा यांच्या कालावधी बाबत आपणास अवगत करण्यात येत आहे. मुद्दा क्र.१ ते ६ चे अवलोकन करून अचूक कार्यवाही करण्यात यावी. सदर परीक्षांच्या कालावधीबाबत विद्यार्थ्यांना आपल्या स्तरावरुन सूचित करण्यात यावे.

(डॉ.मीनाक्षी राऊत)
विभागीय सचिव(प्र.),
पुणे विभागीय मंडळ, पुणे- ०५